



# पारनेर दर्शन






वर्ष ३ अंक ४, गुरुवार १४ नोव्हेंबर २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# मी लंके साहेबांची वाघीण, कसे काम करते तेच पहा!

## ■ महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी लंके गरजल्या ■ भाळवणी येथे विक्रमी सभा ■ बाबासाहेब तांबे, विकास रोहोकले यांचा राष्ट्रवादीत प्रवेश



■ भाळवणी गटातील प्रचाराचा नारळ फोडल्यानंतर महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी लंके यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

भाळवणी : विशेष प्रतिनिधी

**मला भाषण करता येत नाही, मी विधिमंडळात काय बोलणार अशी टीका विरोधक करीत आहेत. मी विरोधकांना निक्षूण सांगते की, मी खा. नीलेश लंके यांच्या पावलावर पाऊल ठेउन काम करणार असून मी लंके साहेबांची वाघीण आहे हे लक्षात ठेवा असा इशारा महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी लंके यांनी दिला. दरम्यान या सभेत जिल्हा परिषदेच्या कृषि व पशुसंवर्धन समितीचे मा.सभापती बाबासाहेब तांबे, पंचायत समितीचे मा. सदस्य विकास रोहोकले यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला.**

महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी लंके ढवळपुरी गटातील प्रचाराचा शुभारंभ भाळवणीचे ग्रामदैवत श्री नागेश्वर मंदिरात नारळ वाढवून करण्यात आला. त्यावेळी लंके यांनी विरोधकांच्या टिकेला उत्तर देत इशारा दिला.

राणी लंके म्हणाल्या, आजची गर्दा पाहता ही प्रचारसभा नाही तर विजयी सभा आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. खासदार नीलेश लंके हे आमदार असताना त्यांनी मतदारसंघासाठी मोठा निधी मंजुर केला आहे. भविष्यातही विकास कामांची ही परंपरा सुरूच राहणार असल्याचा विश्वास लंके यांनी व्यक्त केला.

यावेळी बोलताना खा. नीलेश लंके म्हणाले, ज्यांनी प्रवेश केला, पाठींबा दिला. त्यांना सर्वांना प्रतिष्ठा, सन्मान दिला जाईल. पुर्वीच्या सहकाऱ्यांनाही त्यांचा सन्मान मिळेल. जसे कळसाला महत्व तसेच पायाला महत्व आहे. तुम्ही काही काळजी करू नका. जवळयात पाहा एकच वेळी दोघांना बाजार समितीची उमेदवारी दिली व विजयी देखील केले. महाविकास आघाडीचे सरकार येणार आहे. सर्वांना योग्य न्याय मिळेल. तुमच्या सर्वांच्या आशीर्वादाने माझे पक्षात चांगले वजन आहे. राजकारणात कोणी कोणाचे मित्र अथवा शत्रू नसतात. महाविकास आघाडीमध्ये विविध विचारसरणीचे पक्ष एकत्र आले आहेत. तुम्ही एकत्र आले तर बिघडले कुठे ? गोरेगांवमधील दोन गट पूर्वी एकत्रच होते. सर्वांनी गुण्यागोंविंदाने रहावे. समुद्रासारखे मन असणारा मी माणूस आहे. माझ्या खांद्यावर मान टाकल्यावर ती सुरक्षित ठेवण्याची माझी जबाबदारी आहे. मनमोकळे रहा, मोठे मताधिक्य द्या. मी साधा माणूस आहे कामाचा आहे एकदिलाने काम करू. विश्वास संपादन करणे महत्वाचे असते असे सांगत नव्याने प्रवेश केलेल्यांचे स्वागत करतानाच पूर्वाश्रमीच्या कार्यकर्त्यांनाही खा. लंके यांनी दिलासा दिला.

यावेळी प्रा.शशिकांत गाडे, बाबासाहेब तरटे, माधवराव लामखडे, जयंत वाघ, अशोक घुले, बाबासाहेब तांबे, विकास रोहोकले, सुरेश धुरपते, सुदाम पवार, बाळासाहेब हराळ, गंगाराम रोहोकले, कारभारी पोटघन, ॲड. राहुल झावरे, संपत म्हस्के, प्रकाश राठोड, डॉ. नितीन रांधवन, सुमन तांबे, लिलाबाई रोहोकले, बबलू रोहोकले, राजेश भनगडे, गणेश हाके, अप्पासाहेब शिंदे, भास्कर शिंदे, मोहन रोकडे, राजेंद्र चौधरी, दीपक गुंजाळ, सुवर्णा धाडगे, प्रियंका खिलारी, सुनीता झावरे, ज्योती रोडे आदी उपस्थित होते.

### नाकर्तेपणा झाकण्यासाठी आमिष !

पंधराशे रूपयांनी काही फरक पडणार नाही. महिला भोळया नाहीत. सरकारचा नाकर्तेपणा झाकण्यासाठी दिलेले हे आमिष आहे. एकीकडे द्यायचे व दुसरीकडे काढून घेणारे हे फसवे सरकार असल्याचे भुषणराजे होळकर यांनी सांगितले.

### महाराष्ट्र जपण्यासाठी शरद पवार मैदानात

शरद पवारांनी महाराष्ट्र घडविला तो जपण्यासाठी ते पायातून रक्त येत असतानाही ते दररोज सहा सहा सभा घेत आहेत. त्यांनी नीलेश लंके यांच्यासारखा खासदार संसदेत पाठविला ही त्यांची ताकद असल्याचे भुषणराजे होळकर यांनी सांगितले.

### महायुती सरकारने वाद निर्माण केले

पुरोगामी विचारांचा महाराष्ट्र शिवाजी महाराजांनी आठरा पगड जातींना बरोबर घेऊन स्वराज्य स्थापन केले. शरद पवारांनी जातीय सलोखा राखत विविध विषय चांगल्या पध्दतीने हाताळले. महायुती सरकारने मात्र वाद निर्माण करण्याचे काम केल्याचे होळकर म्हणाले.

### काम करणारांना अशक्य काही नाही

आम्ही काम करतो. आमचे काम बोलते. राणी लंके यांना विधिमंडळात बोलता येईल का अशी टीका विरोधक करत आहेत. काम करणारांना काहीही अशक्य नसते. राणी लंके या विधिमंडळात प्रभावी काम करतील, लवकरच ते दिसेलही असे सांगत खा. लंके यांनी विरोधकांना उत्तर दिले.

### महायुतीने बटटयाबोळ केला

आपण मैदान मारले आहे. विरोधक शिल्लक राहीले नाहीत. महायुतीने जाती जातीमध्ये भांडणे लावली. सबका साथ सबका विकास म्हणत महायुतीने बटटयाबोळ केला आहे. ओबीसी,मराठा, दलित काही सोडले नाही. रोजगार, उद्योगधंद्यांचे अश्वासन दिले गेले मात्र काहीच झाले नसल्याचे भुषणराजे होळकर यांनी सांगितले.

### खा. लंकेंप्रमाणेच राणी लंकेही भाषण करतील

उपस्थितांचा उत्साह पाहीला तर आजच गुलाल उधळण्यास हरकत नाही. सन २००९ रोजी नीलेश लंके हे तालुकाप्रमुख झाले त्यावेळी त्यांना भाषण करता येत नव्हते आज ते खासदार झाले असून उत्तम भाषण करतात. त्यांच्याप्रमाणेच राणीताई लंके या अस्सलिखित भाषण करतील. कबड्डी स्पर्धावेळी नीलेश लंके यांनी क्रिडा मंत्र्यांना पत्र दिल्यानंतर १०० कोटींची मागणी केली. त्याचे विश्लेषनही त्यांनी चांगले केले. त्यानंतर मंत्र्याने शंभर कोटी रूपयांपेक्षाही अधिक निधी देण्याचा शब्द दिला. यावरून त्यांची प्रशासनावरील पकड लक्षात येते.

प्रा. शशिकांत गाडे
जिल्हाप्रमुख, शिवसेना

### स्त्री म्हणून राणी लंके यांचा सन्मान करायचाय

तरूण वर्गाला उर्जास्त्रोत देणारे खा. नीलेश लंके आहेत. असा ध्येयवेडा आमदार ज्यांनी गोरगरीबांची कोरोना काळात सेवा केली. त्यांचे हे काम जगाने पाहिले आहे. आता त्यांच्या पत्नी राणी लंके या तालुक्याच्या पाहिल्या आमदार म्हणून विधिमंडळात जाणार आहेत. ढवळपुरी जिल्हा परिषदेचा गट राणी लंके यांच्या पाठीशी उभा राहणार आहे. भारतीय संस्कृतीमध्ये स्त्रीला मान सन्मान दिला जातो. तसाच मान सन्मान राणी लंके यांना द्यायचा आहे.

लिलाबाई रोहोकले
सरपंच, भाळवणी

### महायुती सरकारला सत्तेतून खेचा

सभेची गर्दी पाहता राणी लंके या आजच आमदार झाल्या आहेत. महायुती सरकारने जे निर्णय घेतले त्यामुळे शेतकऱ्यांचे हाल झाले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयामध्ये यांनी भ्रष्टाचार केला. या सरकारने महाराष्ट्राची अस्मिता धुळीस मिळविली. त्यांना सत्तेवरून खाली खेचण्यासाठी राणी लंके यांना मतदान करा.

जयंत वाघ
जिल्हाध्यक्ष, राष्ट्रीय काँग्रेस

### लंके यांचा विजय सव्वा लाखांनी होईल

ढवळपुरी गटातील बाबासाहेब तांबे व विकास रोहोकले यांनी राणी लंके यांना पाठींबा देण्याचा निर्णय कौतुकास्पद आहे. राणी लंके या सव्वा लाख मतांच्या मताधिक्क्याने विजयी होतील.

संभाजी रोहोकले
अध्यक्ष, राष्ट्रीय काँग्रेस

### नगरमधून ५० हजारांचे लिड देणार

नगर तालुक्याचा एक उमेदवार असला तरी राणी लंके यांना किमान ५० हजार मते देणार आहोत. राणी लंके ही आमची लेक आहे तर पारनेरची सुन आहे. आता मताधिक्क्यामध्ये कोण पुढे राहील याची उत्सुकता आहे.

माधवराव लामखडे
मा. जि प सदस्य

### ढवळपुरी गटाची खंबीर साथ

राणी लंके या विक्रम करणार आहेत. पहिलीच उमेदवारी मिळवून त्या पहिल्या महिला आमदार म्हणून विधिमंडळात जाणार आहेत. ढवळपुरी परिसरातून राणी लंके यांना खंबीर साथ मिळेल.

डॉ. राजेश भनगडे
मा. सरपंच, ढवळपुरी

### महिला आमदार म्हणून विधीमंडळात जाणार

आज आपल्या सर्वांचा एकोपा आहे. राणी लंके यांना सर्वाधिक मताधिक्य देऊ. राणी लंके मोठया मताधिक्क्याने पहिल्या महिला आमदार म्हणून विधिमंडळात जाणार आहेत.

सुमन तांबे
सरपंच, गोरेगांव

### सोशल मीडिया फार मनावर घेऊ नका

महायुतीच्या सभेमधील वडिलांचा फोटो व्हायरल झाला होता. त्याबाबत सुरेश धुरपते यांनी खुलासा केला. ते म्हणाले, वडील गावात आल्यानंतर त्यांना जबरदस्तीने वाहनात बसून नेले गेले. वडील आजही या सभेस उपस्थित आहेत. पूर्वीही आम्ही लंके साहेबांसोबत होतो, आजही आहोत असे धुरपते म्हणाले. धुरपते यांनी फेसबुक, व्हॉटसॲप वरील संदेशांचे जास्त मनावर घेऊ नयेत असा सल्ला खा. नीलेश लंके यांनी दिला.

### काय झाडी, काय डोंगर !

तुमच्या पंधराशे रूपयांनी आमचे घर चालणार आहे का ? आमच्या मुलांना चांगले शिक्षण द्या, आम्हाला रोजगार द्या. राणी लंके यांना शिक्षणावर ट्रोल केले जाते. काय झाडी काय डोंगर एकदम ओके हे आमदार म्हणून चालत असतील तर घरचे काम सांभाळून आमदार होणारी आमची भगिनी का चालत नाही ? राणीताई यांच्या पाठीशी सर्वांनी खंबीरपणे उभे रहावे.

प्रियंका खिलारी
शिवसेना महिला आघाडी
तालुकाप्रमुख

### राणीताई नामदार होणार

हा जनसमुदाय पाहता राणीताई लंके आमदार नव्हे तर नामदार होणार आहेत. आज आपल्यासोबत जे लोक आले आहेत त्यांनी यापुढील काळात खा. नीलेश लंके यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे रहावे.

बबलू रोहोकले

### रोहोकले यांच्या स्वागताने वेधले लक्ष

विकास रोहोकले यांनी या सभेचे नियोजन केले होते. कार्यक्रमस्थळासह त्यांनी राणी लंके व खा. नीलेश लंके यांचे त्यांनी व त्यांच्या समर्थकांनी केलेल्या स्वागताने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. रोहोकले यांच्या निर्णयामुळे भाळवणीसह ढवळपुरी गटामध्ये राणी लंके यांच्या मताधिक्क्यात वाढ होण्यास मदत होणार आहे.

### बाबासाहेब तांबे यांचे शक्तिप्रदर्शन

मोटारसायकल रॅलीसह इतर वाहनांसह सभास्थळी पोहचलेल्या जिल्हा परिषदेच्या कृषि व पशुसंवर्धन समितीचे मा. सभापती बाबासाहेब तांबे यांनी मोठे शक्तिप्रदर्शन केले. कोणताही कार्यक्रम ताकदीने करणारे बाबासाहेब तांबे यांचे वेगळेपण भाळवणीमध्येही दिसून आले. तांबे हे लंके यांच्यासोबत गेल्यामुळे त्याचा मोठा फायदा राणी लंके यांना होणार आहे.

### राणी लंके सक्षम !

विधिमंडळात काम करताना राणी लंके यांना बोलता येईल का असा प्रश्न विरोधक उपस्थित करत आहेत. त्यांना मी एकच सांगू शकतो की राणी लंके या सक्षम आहेत. पंचायत समिती, जिल्हा परिषद, नियोजन समितीच्या सदस्या म्हणून त्यांनी सक्षमपणे काम पाहिले आहे. विधिमंडळात त्यांचे काम निश्चित वाखाणन्याजोगे असेल. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार येणार असून सरकारच्या मंत्रीमंडळात राणी लंके यांना मंत्रीपद मिळणार आहे. खा. लंके यांनी ढवळपुरी एमआयडीसीचा प्रश्न माग लावावा.

बाबाजी तरटे

### नीलेश लंके दिलदार व्यक्तिमत्व

खा. नीलेश लंके यांनी सर्वच पैलवान एकत्र केले आहेत. त्यामुळे मैदान मोकळे असून राणी लंके यांचा विजय निश्चित आहे. मल्हारराव होळकर ज्या पध्दतीने काम करायचे त्याच पध्दतीचा दिलदार माणूस नीलेश लंके आहे.

भुषणराजे होळकर
अहिल्यादेवी होळकर यांचे वंशज

### फडणवीसांनी दहा वर्षात आरक्षण दिले नाही

या भागात धनगर समाज आहे. या समाजाची व्यथा होती. अनेक वर्षांपासून आरक्षणासाठी आम्ही झगडतो आहोत. सन २०१४ मध्ये पहिल्या कॅबिनेटमध्ये आरक्षण देतो म्हणणाऱ्या अनाजीपंत देवेंद्र फडणविसांनी दहा वर्षांत आरक्षण दिले नाही. खा. लंके यांनी लोकसभेत आरक्षणासाठी पाठपुरावा करावा अशी मागणी भुषणराजे होळकर यांनी केली.

### तांबे, रोहोकलेंच्या साथीने ढवळपुरी गट भक्कम

बाबासाहेब तांबे, विकास रोहोकले यांनी खा. नीलेश लंके यांना साथ देण्याचा निर्णय घेतल्याने राणी लंके यांच्यासाठी ढवळपुरी गट भक्कम झाला आहे. या गटातून मोठे मताधिक्क्य मिळवून देण्यासाठी परीश्रम करण्याची घोषणा तांबे व रोहोकले यांनी केली.

### अहिल्यादेवींप्रमाणे राणी लंके आदर्श काम करतील

पारनेर तालुक्यात ढवळपुरीच्या गावडेवाडीतील आमच्या पणजी होत्या. त्या इंदोरच्या महाराणी झाल्या. पहिली चारचाकी चालविणाऱया त्या पहिली महिला होत्या. या तालुक्याला मोठा वारसा आहे. अहिल्यादेवींसारखे काम करणाऱ्या राणीताईना निवडूण द्यायचे आहे. अहिल्यादेवींप्रमाणे राणी लंके या आदर्श काम करतील.

भुषणराजे होळकर
अहिल्यादेवी होळकर यांचे वंशज




निरोगी आरोग्याचा कानमंत्र...

# निरामय



## चिमुकल्यांना चायनिजची सवय घातक

**हल्ली लहान मुलांना चटपटीत पदार्थ खायला आवडतात. त्यांना घरी केलेला वरण- भात किंवा भाजी पोळी नकोशा होतात. पण त्यांना तिखट आणि तळलेले पदार्थ दिसले तर असे पदार्थ मुलं मटामट गिळतात. हल्ली अगदी एक वर्षाचे मुलं देखील असे चटपटीत पदार्थ खाण्याच्या आहारी गेलेले आहेत. तिखट किंवा कितीही जड आणि खायला कठीण असे पदार्थ असले तरी ते लहान बाळांकडून खाल्ले जातात. भारतात सर्वाधिक खाल्ला जाणारा पदार्थ म्हणजे 'चायनीज' चीनमध्येही जसे बनवले जात नाही तसे चायनीज भारतात मिळते. भारतात मिळणारे चायनीज चटपटीत आणि चटकदार असते. पण लहान मुलांना याची सवय लावणे महागात पडू शकते. लहान मुलांना त्याचा काय त्रास होऊ शकतो ते जाणून घेऊया...**

### पोट बिघडणे

लहान मुलांचे पोट लगेच बिघडते. चायनीजमध्ये इतके मसाले असतात की, त्यामुळे त्यांचे पोट लगेच बिघडू शकते. त्याची थोडी वेगळी चव असल्यामुळे ते खाण्याची इच्छा मुलांना होते. अनेकदा मुलं घरचं खात नाहीत. पण हे पदार्थ खातात म्हटल्यावर डोक्याला ताप म्हणून त्यांना आवडीचे पदार्थ देतात. पण त्यामुळे मुलांना जुलाब होण्याची शक्यता असते. लहान मुलांना पोट बिघण्याचा त्रास झाला की, तो निस्तरताना अधिक त्रास होतो. त्यामुळे चायनीज खाण्याची सवय लागली असेल तर ती सवय आताच सोडून द्या.

### शौचाला त्रास होणे

चायनीज पदार्थ घरी जरी बनवले तरी देखील आपण त्यामध्ये व्हिनेगर आणि वेगवेगळे सॉस घालतो. या सॉसमध्ये असलेले घटक लहान मुलांच्या पोटासाठी अजिबात चांगले नसतात. त्यामुळे मुलांचे पोट बिघडू शकतेच. पण काहींना त्यामुळे शी न होण्याचा त्रास देखील होऊ लागतो. खूप जणांना अशावेळात पोट साफ होत नाही. चायनीज चटपटीत असते की, त्यानंतर जर योग्य प्रमाणात पाणी प्यायले गेले नाही तरी देखील त्याचे नुकसान होऊ शकते. त्यामुळे मुलांच्या पोटाचे आरोग्य चांगले ठेवायचे असेल तर तुम्ही नक्कीच असे पदार्थ वगळायला हवेत.

### तोंड फुटणे

चटपटीत पदार्थ खाल्ल्यामुळे अगदी मोठ्यांनाही होणारा त्रास म्हणजे तोंड फुटणे. यालाच आपण अल्सर असे म्हणतो. मोठ्यांना अल्सर झाला तर त्यांना सांगता येते. पण लहान मुलांना ते सांगता येत नाही. त्यामुळे ते खूप चिडचिड करु लागतात. त्यांना रोजचे जेवण खाता देखील येत नाही. अल्सरचा त्रास सतत होणे लहान मुलांच्या आरोग्यासाठी अजिबात चांगले नाही. त्यामुळे लहान मुलांना तुम्ही या सगळ्या गोष्टी देणे थांबवा. त्यामुळे तुमच्या मुलाचे आरोग्य धोक्यात येते. असा त्रास झाला असेल तर मुलांना तूप खायला द्या त्यामुळे त्यांना आराम मिळण्यास मदत मिळेल. लहान मुलांच्या आहारात चांगल्या गोष्टी असणे फारच गरजेचे असते. बरेचदा लहानपणी लावलेल्या या सवयी मोठेपणी अधिक त्रासदायक ठरु शकतात. लहान मुलांमधील स्थुलपणा हा देखील यासाठी कारणीभूत ठरू शकतो. त्यामुळे आरोग्याची योग्य काळजी घ्या.

## अंडे कच्चे खावे का ?

**कोणी आहारात काही गोष्टी समाविष्ट करायला सांगितल्या की आपण त्याचे फायदे ऐकून डोळे झाकून त्याचा समावेश आहारात करतो. पूर्वीच्या काळी खूप जण त्यांच्या आहारातील कच्च्या अंड्याविषयी अनेकदा सांगत असतं. कच्चे अंड ? शी शी कसे काय खाऊ शकतात. खूप जणांना अंड्याचा वास देखील आवडत नाही. पण काही जण आहारात अंड्याचा समावेश असा करतात. तुम्हीही कच्चे अंड खात असाल तर तुम्हाला त्याचे परिणामही माहीत असायला हवे. जाणून घेऊया कच्चे अंडे खाण्याचे शरीरावर होणारे परिणाम...**

अंड्यामध्ये प्रोटीन असते हे आपण सगळेच जाणतो. त्यासाठी आपण आहारात अंड्याचा समावेश हा वेगवेगळ्या रेसिपीच्या माध्यमातून करत असतो. पण जे बॉडी बिल्डींग करतात ते प्रोटीन्स अधिक मिळावे यासाठी कच्चे अंडे खातात. असे मानले जाते की, कच्चे अंडे खाल्यामुळे जास्त प्रोटीन मिळते. म्हणून शेक्स किंवा असे काही पिणारे लोकं त्यामध्ये कच्चे अंडे घालतात. त्यामुळे त्यांना थेट प्रोटीन मिळते. पण हल्ली खूप कमी जणं कच्ची अंडी खाताना दिसतात.

### असे करावे अंड्याचे सेवन

अंडी कच्ची खाल्ली तर ती आरोग्यासाठी घातक ठरू शकतात. पण तुम्ही अंडी शिजवून खाल्ली तर त्याचे फायदे मिळण्यास मदत मिळते. त्यामुळे तुम्हाला प्रोटीन मिळवण्यासाठी तुम्ही अंडी ही वेगवेगळ्या पद्धतीने आहारात समाविष्ट करायला हवी. अंडी उकडून, त्याची आमटी करून किंवा त्याचे आम्लेट करून तुम्ही खाल्ले तर तुम्हाला त्याचा त्रास होत नाही. उलट कच्च्या अंड्यामुळे होणारी समस्या यामुळे टळते.



### कच्च्या अंड्याचे सेवन करण्याचे दुष्परिणाम



कच्च्या अंड्याचे सेवन करत असाल तर तुम्हाला त्याचे दुष्परिणाम माहीत असायला हवेत...

- अंडे कच्चे असेल तर त्यापासून इन्फेक्शन होण्याची शक्यता असते. कारण कच्च्या बलकावर काहीही न केल्यामध्ये जर काही असेल तर ते तुम्हाला बाधू शकते.
- कच्चे अंडे हे पचण्यास कठीण असते. एखाद्याला कच्चे काहीही खायची सवय नसेल तर त्यांना यापासून त्रास होऊ शकतो.
- एखादा पदार्थ खाल्ल्यावर आपल्याला जसा त्रास होऊ शकतो. तसा तुम्हाला काही तासांनंतर उलट्यांचा त्रास होऊ शकतो. त्यामुळे तुम्ही अंडे खाऊ नका.
- अंड शिळं झालेलं असेल तर त्यामध्ये काही घटक बदलत असतात. त्यामुळे तुम्ही अशा अंड्याचे सेवन केले तरी देखील तुम्हाला त्याचा त्रास होऊ शकतो.
- कच्च्या अंड्याच्या सेवनामुळे जुलाब होण्याची शक्यता असते. त्यामुळे तुम्ही अंड खाताना विचार करा.
- कच्च्या अंड्याचे सेवन केल्यामुळे पोटदुखीचा त्रासही होऊ शकतो. ज्याचे रुपांतर जुलाबमध्ये होऊ शकते.



## गर्भधारणेच्या वैज्ञानिक गोष्टी

**गर्भधारणा हा प्रत्येक स्त्रीच्या आयुष्यातील महत्वाचा क्षण आहे. गर्भधारणा झाले हे कळले तरी देखील त्याचा आनंद त्या स्त्रीला नाही तर संपूर्ण कुटुंबाला होत असतो. पण पूर्वीच्या काळी गर्भधारणा झाली की, काही गोष्टी या हमखास पाळल्या जात होत्या. या कल्पना फार बुरसट अशा वाटत असल्या तरी त्यामध्ये काही अंशी तथ्य असणे हे स्वाभाविक होते. तुमचीही नुकतीच गर्भधारणा झाली असेल तर गर्भाची आणि तुमची काळजी घेणे फार गरजेचे असते. थोडे जुने समज-गैरसमज आणि काही वैज्ञानिक गोष्टी यांचे भान ठेवून नेमकी कोणती काळजी घ्यायची ते जाणून घेऊया...**

### काही महिने सांगू नका

तुम्हाला गर्भधारणा झाली तरी देखील तुम्ही त्याबाबत काही काळ न सांगितलेले बरे असते. पूर्वीच्या काळी आजी किंवा इतर लोकं ही इतरांना काहीही सांगू नका या विषयी बोलत असतं. पण आता आपणच कधीकधी सिक्रेट न ठेवता सोशल मीडियावर सगळे काही सांगून टाकतो. पण त्याची काहीही गरज नाही. कारण पहिले काही महिने हे फार काळजी घेण्यासारखे असतात. गर्भधारणा झाली तरी देखील बाळाची ठराविक वाढ होईपर्यंत तुम्ही कोणाला सांगू नका. हेच अधिक चांगले. इतरांना सांगून आपली उर्जा घालविण्यापेक्षा तुम्ही काही खास गोष्टींची काळजी घ्यायला अजिबात विसरू नका.

### घ्या काळजी

गर्भधारणा झाली असे कळाले की खूप जणांचा उत्साह वाढतो. त्यांना काय करावे आणि काय करू नये असे होऊन जाते. त्यामुळे अशावेळी हेल्दी खाण्याचा नादात बरेचदा चुकीच्या गोष्टी खाल्ल्या जातात त्यामुळे तुम्ही असे करण्यापेक्षा तुम्ही रोजचा पण नियमित आहार घ्या. जेवणाच्या वेळा चुकवू नका. जेवणाच्या वेळा आणि कामाच्या वेळा यांचे भान ठेवा. त्यामुळे नक्कीच तुम्हाला त्याचा त्रास होत नाही.



### व्यायाम

खूप जण या दिवसात खूपच आळशी होऊन जातात किंवा अधिक काम करु लागातत. दोन्ही गोष्टी या आरोग्यासाठी तशा हानिकारकच म्हणाव्या लागतील. कारण गर्भधारणेच्या वेळी अतिशय सुस्त असूनही चालत नाही. त्यामुळे शरीर सुजण्याची शक्यता जास्त असते. व्यायाम हा कितीही चांगला असे म्हटले तरी देखील व्यायाम हा काही जणांसाठी त्रासदायक ठरु शकतो. त्यामुळे तुम्ही कोणाचा तरी सल्ला घेतल्याशिवाय आणि मार्गदर्शक असल्यासच व्यायाम करावा. काही जणांची गर्भधारणा ही अत्यंत नाजूक अशी असते. त्यामुळे त्यांना विशेष काळजी घ्यावी लागते.

### वाचन आवड

हल्ली फोन बाहेर कोणाचेही विश्व नाही. काही झाले तरी फोन हातात असतो. अनेक गरोदर बायका तासनंतास फोनवर असतात. त्यामुळे डोळ्यांना तर त्रास होतोच शिवाय आपल्या बाळावरील गर्भसंस्कार देखील चांगले होत नाही. त्या ऐवजी शक्य असेल तितके तुम्ही वाचयाला हवे. तुम्ही जितके वाचाल तितके तुमच्यासाठी नक्कीच चांगले असते. त्यामुळे तुम्ही वाचनाची सवय लावून घ्या. पुस्तकं वाचताना चांगली अशी पुस्तके वाचावीत. त्यामुळे मन शांत राहण्यास मदत मिळते. आता गर्भधारणा झाली असेल तर या काही गोष्टी लक्षात घेऊन नक्कीच काळजी घ्या.

## झोपेतून उठून बाळ रडतंय?



**मुलं लहान असताना विशेषतः अशा वयात ज्या वेळात त्यांना काय दुखत खुपत त्यांना सांगता येत नाही. त्यामुळे त्यांना नेमका कसला त्रास होतोय हे कळायला बरेचदा वेळ जातो. अशातच काही लहान मुलं झोपेतून अचानक रडत उठतात. त्यांचे रडणे इतके असते की, त्यांना काय झाले हे आपल्याला काही वेळ कळत नाही. आधीच झोपमोड आणि लहान बाळांचे रडणे यामुळे पालकांनाही गोंधळायला होतो. पण झोपेत लहान मुलं रडण्यामागे काही ठराविक कारण असू शकतात. त्यानुसार पालकांनी तयारी केली तर तुम्हाला त्रासही होणार नाही आणि मुलांना शांत करणेही सोपे जाईल...**

- पोटदुखी : अनेकदा मुलांना पोटात कळ येते. त्यांनी जे दिवसभरात खाल्ले असेल ते अन्नपदार्थ त्यांना पचले की नाही की त्यांच्या पोटात गॅस तयार होतो. लहान मुलांच्या पचनाची शक्ती थोडी मंदच होत असते. त्यातच जर त्यांनी काही जंक फूड किंवा चीझ, बटाटा, डाळी असे काही पदार्थ खाल्ले असतील तर त्यांना गॅस होऊ शकतो. लहान मुलं खूप जास्त पादतात. पण रात्री झोपेत असताना त्यांना पोटात होणारी हालचाल कळत नाही. त्यांना पोटातून हवा जाण्याची संकल्पना नसल्यामुळे त्यांना अचानक रडू कोसळते. पोटात गॅस झाला की, हवा ही हळूहळू पास होते. कधी कधी लहान बाळ पादल्यानंतर हसते याचे कारण त्याला बरे वाटत असते. त्यामुळे पोटदुखीचा त्रास होत असेल तरी देखील मुलं झोपेतही भोकाड पसरतात.
- कानदुखी : वातावरणाचा त्रास लहान मुलांना पटकन होतो. थंडी किंवा उष्णता वाढली की, कानदुखीचा त्रास अनेकांना बळावतो. अगदी तान्हे बाळ असेल किंवा थोडे बोबडे बोलणारे बाळही कानदुखीच्या त्रासाने त्रस्त असेल तर त्याला काय होते हे सांगता येत नाही. अशावेळी बाळ रडत राहते. त्यांना काय होते हे सांगता येत नाही. कानदुखी झाली की बाळ सतत रडत राहते. कानदुखीसाठी काही ड्रॉप्स तुम्ही डॉक्टरांकडून घेऊ शकता. कानदुखीमुळे डोक्यात जाणारी सणक कमी होण्यास मदत मिळते. त्यामुळे बाळाला त्रासही होत नाही. वातावरणात असा बदल झाला असेल. खूप प्रवास झाला असेल तरी देखील लहान मुलांना असा त्रास होऊ शकतो.
- भूक लागणे : लहान मुलांना पोट भरले हे कधीही नीट सांगता येत नाही. कधी कधी ते झोपेत अचानक उठून रडू लागतात. कारण त्यांना खूप भूक लागलेली असते. अशावेळी त्यांना दूधाची बाटली तोंडात दिली की ते पुन्हा शांत होतात. बहुतेकदा लहान मुलांच्या रडण्यामागे त्यांना लागलेली भूक असू शकते. तुमचेही तान्हे बाळ कमी जेवत असेल तर तुम्ही अगदी नक्कीच त्याला वेळोवेळी खायला द्यायला हवे. एकाचवेळी त्यांना भरवण्यापेक्षा तुम्ही त्याला थोड्या वेळाने भरवा. दूधावर असलेल्या बाळांना आईचे दूध किंवा दुधाची बाटली देखील तयार ठेवा. म्हणजे लहान बाळांची चिडचिड होणार नाही.
- वाईट स्वप्न : आपल्या सगळ्यांनाच स्वप्न पडतात. लहान मुलांनाही खूप स्वप्न पडत असतात. काही स्वप्न त्यांना हसवतात. त्यांना काही स्वप्न पडली की हसू येते. तर काही स्वप्नांमुळे त्यांना रडू येते. अशावेळी मुलांना उठवून त्यांना पुन्हा थोपटल्यास ती शांत देखील होतात. जर मुलं स्वप्नातून अशा प्रकारे उठत असतील तर तुम्ही त्यांना झोपताना चांगल्या गोष्टी किंवा गाणी म्हणून दाखवा. आता झोपेतून लहान मुलं अचानक उठून रडत असतील तर या काही गोष्टींचा त्रास त्यांना असू शकतो.



## थंडीत अन्न पुन्हा गरम करून का खाऊ नये ?

**थंडीत गरम गरम पदार्थांचा आस्वाद घेण्याची मौज काही निराळीच आहे. काही पदार्थ गरम खाल्ले तर जास्त स्वादिष्ट लागतात. मात्र यासाठी तुम्ही एखादा पदार्थ वारंवार गरम करून खात असाल तर ते मुळीच योग्य नाही. अनेकांना गरम गरम जेवायला आवडतं म्हणून खाद्यपदार्थ सतत गरम करून खाण्याची सवय असते. वेळ आणि पैसे वाचवण्याचा हा एक सोपा मार्ग असतो. आजकाल यासाठी घराघरात मायक्रोव्हेव दाखल झाले आहेत. मायक्रोव्हेव्हचा वापर कुकींग अथवा बेकींगसाठी कमी आणि अन्नपदार्थ रिहीट अथवा पुन्हा गरम करण्यासाठीच जास्त केला जातो. मात्र असं केल्यामुळे तुमच्या अन्नातील पोषक घटक नष्ट होतात...**

अन्न खाण्यामुळे माणसाची भूक भागतेच पण शरीराचे योग्य पोषण होते. अन्नातील पोषक घटक मिळाल्यामुळे शरीरात



रक्त, मांसपेशी मजबूत होतात. हाडे मजबूत करण्यासाठी आणि रोग प्रतिकार शक्ती वाढण्यासाठी प्रत्येकाला दिवसभरात ठराविक पोषक आहाराची गरज असते. मात्र काही पदार्थ पुन्हा गरम केले तर त्यातील पोषक घटक नष्ट होतात. भाजी, डाळ अथवा अंडं तुम्ही जेव्हा पुन्हा पुन्हा गरम करता तेव्हा त्यातील पोषक घटक उष्णतेमुळे नष्ट होतात. ज्यामुळे असे अन्नपदार्थ खाण्याचा शरीरावर हवा तसा परिणाम होत नाही. अन्नपदार्थांमधून मिळणारे प्रोटीन्स, मिनरल्स, व्हिटॅमिन्स नष्ट झाले तर शरीर कमजोर आणि अशक्त होते.

### शिळे अन्न गरम करताना या गोष्टी ठेवा लक्षात...

महत्त्वाचे म्हणजे अन्नपदार्थ शिजवताना ते जास्त उरणार नाहीत आणि शिळे खावे लागणार नाहीत याची काळजी घ्या. कारण शिळ्या पदार्थामध्ये ताज्या पदार्थांमधून मिळणाऱ्या पोषण घटकांपेक्षा कमी पोषणमूल्ये असतात. शिवाय जेव्हा तुम्ही ते पुन्हा गरम केले तर उष्णतेसोबत त्यात उरलेले पोषकतत्त्वंदेखील नष्ट होऊ शकतात. यासाठीच जर काही कारणांमुळे तुम्हाला शिळे अन्न जेवावे लागले तर ते फक्त एकदाच आणि थोड्या वेळासाठी गरम करा. गरम केल्यावर पदार्थ लगेच खा. ज्यामुळे त्यातील पोषक घटक नष्ट होण्याआधी तुम्ही ते पदार्थ खाल्लेले असतील. तळलेले पदार्थ पुन्हा गरम करू नका आणि वापलेले तेलदेखील पुन्हा वापरू नका.

## शॉर्ट न्यूज

### पारनेरप्रमाणेच नगर तालुक्याला न्याय

**नगर :** पारनेर विधानसभा मतदारसंघात अहिल्यानगर (नगर) तालुक्यातील अनेक गावे समाविष्ट आहेत. पारनेरच्या बरोबरीनेच नगर तालुक्याला न्याय देणार असल्याची ग्वाही महायुतीचे उमेदवार काशीनाथ दाते यांनी दिली. अहिल्यानगर तालुक्यातील कामरगाव, चास, पिंपळगाव कौडा, खंडाळा, देऊळगाव सिध्दी, खडकी, घोसपुरी, अकोळनेर, घोसपुरी व भोरवाडी, आदी गावांत काशीनाथ दाते यांनी प्रचारदौरा केला. यावेळी ते बोलत होते.

### दिलीप पवार यांचा शिवसेनेत प्रवेश

**नेवासा :** माजी पंचायत समिती सदस्य व महायुतीचे खंदे नेते नेवासा तालुक्यातील पाचेगावचे दिलीप पवार यांनी आमदार शंकरराव गडाख यांच्या हस्ते शिवसेनेत प्रवेश केला आहे. महायुतीचे उमेदवार विठ्ठलराव लंघे याना ऐन निवडणुकीच्या तोंडावर मोठा राजकीय धक्का बसला असून या प्रवेशामुळे गडाख यांची ताकद निश्चितच वाढली आहे. गेल्या ३ वर्षांपासून भाजप मधील अनेकांनी गडाख गटात प्रवेश केला आहे. त्यात माजी जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, अनेक गावांतील सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, तसेच विविध भाजपचे सदस्य यांनी पक्षत्याग केला.

### कर्जत जामखेड मतदार संघात काटे की टक्कर

**कर्जत :** अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत जामखेड मतदारसंघांमध्ये यावर्षी विधानसभेच्या निवडणुकीमध्ये दुरंगी लढत होणार आहे. भारतीय जनता पार्टी कडून प्राध्यापक आ. राम शिंदे व राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाकडून आ. रोहित पवार हे दोन उमेदवार रिंगणात आहेत. मागच्या पंचवार्षिक ला आमदार रोहित पवार यांनी प्राध्यापक आ. राम शिंदे यांचा पराभव करत विजय मिळवला होता. यावर्षी देखील त्यांच्यामध्ये काटे की टक्कर पाहावयास मिळणार आहे. सध्या तरी या ठिकाणचे वातावरण ५०-५०% आहे. यामध्ये कोण विजयी होणार हे निवडणुकीच्या निकालानंतर स्पष्ट होईल.

### सोपान तांबडे यांचा काँग्रेसमध्ये प्रवेश

**संगमनेर :** काँग्रेस विधीमंडळ पक्षनेते आमदार बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष सोपान तांबडे, डिग्रसचे युवा नेते सोमनाथ वारे यांनी आपल्या सहकाऱ्यांसह काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला आहे. यावेळी आमदार थोरात म्हणाले, काँग्रेस पक्षाला मोठी त्यागाची व बलिदानाची परंपरा आहे. देशाच्या विकासात काँग्रेसचे अत्यंत महत्वपूर्ण योगदान असून राज्यांमध्ये आणि देशामध्येही काँग्रेस पक्ष उभारी घेत आहे.

### राहुल जगताप यांच्या गटाला धक्का

**श्रीगोंदा :** कोळगाव परिसरातील महत्त्वाचे राजकीय नेतृत्व असलेल्या हेमंत नलगे यांनी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीच्या उमेदवार अनुराधा नागवडे यांच्या प्रचारात सहभागी होण्याचा निर्णय घेतल्याने या निवडणुकीला अनपेक्षित वळण मिळाले आहे. नागवडे यांना या पाठिंब्याने जोर मिळाल्याने राहुल जगताप यांचा मतदारांवरील प्रभाव कमी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. कोळगाव हे राजकीयदृष्ट्या अत्यंत संवेदनशील गाव असून येथे पाचपुते, नागवडे व जगताप या तिघांचेच प्रभाव आहे.

# नीलेश शेंडगे यांची व्हिएतनाम दौऱ्यासाठी निवड

## आरोग्य विम्यात ग्राहकांना सुविधा



**कुरुंद : प्रतिनिधी**

**स्टार हेल्थ इन्शुरन्स कंपनीमध्ये आपल्या कामाचा ठसा उमटवून जास्तीत जास्त बिजनेस करून एमडी क्लब पूर्ण केल्याबद्दल स्टार हेल्थ कंपनी कडून व्हिएतनाम या देशात जाण्याची संधी विमा प्रतिनिधी नीलेश शेंडगे यांना मिळाली.**

कुरुंद ता-पारनेर सारख्या छोट्याशा गावातून स्टार हेल्थचे काम करणारे विमा प्रतिनिधी नीलेश शेंडगे यांनी अत्यंत कमी कालावधीमध्ये स्टार हेल्थ मध्ये खूप मोठा बिझनेस केला आहे, व ग्राहकांना खूप चांगल्या सुविधा दिल्या आहेत त्यामुळेच त्यांना ही संधी मिळाली कंपनीकडून व्हिएतनाम या देशात त्यांचा सन्मानही होणार आहे.

या त्यांच्या यशाबद्दल नगर दक्षिणचे खासदार नीलेश लंके ,मा. जिल्हा परिषद सदस्य राणीताई लंके, स्टार हेल्थ चे झोनल मॅनेजर विक्रांत कायगावकर, एरिया मॅनेजर रणजीत उजागरे, सेल्स मॅनेजर प्रिया अकोलकर, नीलेश अकोलकर कुरुंद ग्रामस्थ व मित्र परिवाराने शेंडगे यांचे अभिनंदन केले आहे .

# कोणाला पण करा पण पवारांना चॅलेंज करू नका

## रोहित पवारांचा राम शिंदेंना इशारा | महायुतीवरही केला हल्लाबोल

**कर्जत : प्रतिनिधी**

**कर्जत जामखेड येथे शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांची सभा पार पडली. या सभेत बोलताना रोहित पवार यांनी भाजपच्या राम शिंदे यांच्यावर जोरदार टीका केली आहे. राम शिंदे, चॅलेंज करायचे असेल तर कोणाला पण करा पण पवारांना करू नका, असे रोहित पवार म्हणाले आहेत.**

कर्जत जामखेडमध्ये आयपीएलच्या मॅचेस होणार का? असा सवाल राम शिंदे यांनी विचारला होता, त्यावर रोहित पवार म्हणाले, आम्हाला चॅलेंज करू नका, तुम्हाला आयपीएलचे साधे तिकीट तरी मिळते का? ते पाहा, असा टोला रोहित पवारांनी लगावला आहे. पाच वर्षात मी या मतदारसंघात जे काही केले ते केवळ ट्रेलर आहे, पिक्चर अभी बाकी है, असेही रोहित पवार यावेळी म्हणाले आहेत.

सभेत बोलताना रोहित पवार म्हणाले, कर्जत-



जामखेडच्या पहिल्यांदाच निवडून आलेल्या आमदारांची दखल राज्याला घ्यावी लागली. कर्जत- जामखेडचे वजन हे राज्यात वाढले आहे. भविष्यात कर्जत जामखेडमधूनच राज्यातील प्रमुख निर्णय घेतले जातील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका करताना रोहित पवार म्हणाले, देवेंद्र फडणवीस पहाटे शपथविधी करतात तसेच राम शिंदे यांच्याकडे प्रवेशही रात्री होतात. आम्ही दिवसा ढवळ्या काम करतो. या पुढे आम्ही गद्दारांना सोडणार नाही. माझ्या कार्यकर्त्यांच्या केसाला धक्का लावला तर त्यांचे हात छाटण्याचे काम आम्ही करू, असा इशारा देखील रोहित पवारांनी दिला आहे.

पुढे रोहित पवार म्हणाले, देवेंद्र फडणवीस यांनी राम शिंदे यांना सांगितले होते की, काहीही करा रोहित पवारांना मतदारसंघात अडकवून ठेवा, पण त्यांना ते करता आले नाही. पवार साहेबांनी १० वर्षात काय केले असे केंद्रीय गृह मंत्री अमित शहा यांनी विचारले होते, लोक २३ तारखेला दाखवून देतील पवार साहेबांनी काय केले ते. तसेच महाविकास आघाडीचे १७० पेक्षा जास्त आमदार निवडून येतील असा विचास त्यांनी व्यक्त केला आहे.

पुढे ते म्हणाले, माझ्याकडे चुकून गृहमंत्रीपद आले तर महायुतीमधील ६० टक्के नेते गुवाहाटीला जाऊन राहतील. महाविकास आघाडीचा कोणीही गृहमंत्री झाला तरी महायुतीमधील नेत्यांचे भ्रष्टाचाराचे पुरावे देणार, असेही रोहित पवारांनी यावेळी सांगितले आहे.

## वाचकांच्या लेखणीतून

# ... दुर्जनस्तु पदे पदे

सुविचार जेव्हा पद्यातून व्यक्त केला जातो तेव्हा त्याला सुभाषित म्हणावे, अशी मी सुभाषिताची व्याख्या केलेली आहे. ही सुभाषिते लहान थोर अशा सगळ्यांनाच आवडतात. सुभाषितरत्नभाण्डागारम् , सुभाषित रत्न कोश असे सुंदर सुभाषित कोश ग्रंथ संस्कृत भाषेत आहेत. सुभाषितांमुळे मनुष्य विवेकशील आणि ज्ञानसमृध्द होतो. व्यवहार चतुरही होतो.

सर्पदुर्जनयोर्मध्ये वरं सर्पो न दुर्जनः।
सर्पो दशति कालेन दुर्जनस्तु पदे पदे।।

साप आणि दुर्जन यांत साप श्रेष्ठ असतो. दुर्जन नाही. कारण साप कधी तरी दंश करतो; पण दुर्जन पदोपदी छळीत असतो. समाजात दुर्जनांची कमतरता नाही. हे दुर्जन समाजात पूर्वी होते. आत्ता आहेत. पुढेही राहतील. दुर्जनांची भयंकरता या संस्कृत सुभाषितात सुंदर रीतीने वर्णन केली आहे. पुराणांतील देवादिकांना छळणारे राक्षस हे दुर्जनच होते. संत तुकारामांची छळणूक करणारा मंबाजी किंवा संत एकनाथांना त्रास देणारा यवन हे दुर्जनच होते. आजही आपल्या आसपास अनेक दुर्जन वावरत असतात. एखाद्याचे चांगले चालले असेल तर दुर्जनांना ते देखवत नाही. म्हणून एक उर्दू शायर




म्हणतात,

सांपों को भी आज़ादी है हर बसते घर में बसने की।
उनके सर में ज़हर है और आदत भी है डसने की।।

समाजस्वास्थ्य बिघडवणाऱ्या या नराधमांना किंवा दुर्जनांना सरळ मार्गावर आणण्यासाठी आपल्या पोलिसदलाने खलनिग्रहणाय सद्रक्षणाय (दुष्ट-दुर्जनांना वठणीवर आणणे आणि सज्जनांचे रक्षण करणे) असे घोषवाक्य अंगिकारले आहे. ते आधुनिक काळाला शोभणारे आहे. यात दुष्टदुर्जनांचे सरसकट पारिपत्य नाही. त्यांना सुधारण्याची संधीही दिलेली आहे.

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
**निघोज, ता. पारनेर,जि. अहमदनगर.**

# अशी पाखरे येती.. आणिक स्मृती ठेवूनी जाती !

## दहिगावने येथील नवजीवन विद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा



**शेवगाव : प्रतिनिधी**

**दहिगावने (ता. शेवगाव) येथील नवजीवन विद्यालयात १९९८-९९ मध्ये दहावी तुकडी 'अ'मधील माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा नुकताच मोठ्या उत्साहात पार पडला. ज्या वर्गात शिक्षण घेतले, त्याच वर्गातील स्नेहमेळाव्यात हे माजी विद्यार्थी तत्कालिन शिक्षकांसोबत आठवणींमध्ये रममाण झाले होते. तब्बल २६ वर्षांनंतर हे माजी विद्यार्थी एकत्र आले होते.**

माजी विद्यार्थी व सध्या पुणे येथे फार्मा कंपनीत कार्यरत असलेल्या अशोक पवार यांनी गावातील भाऊसाहेब तांबे, दादासाहेब मरकड, दीपक कांबळे, प्रदीप सोनवणे, निवृत्ती आगळे, आबासाहेब जुंदरे यांच्यासह सर्व मित्रपरिवार सोशल मीडिया व प्रत्यक्ष भेटीतून एकत्र केला. माजी प्राचार्य के. वाय. नजन यांच्या मार्गदर्शनाखाली स्नेहमेळाव्याची रूपरेषा ठरवली गेली. या स्नेहमेळाव्याला कारभारी नजन, त्रिंबकराव जाधव, व्ही. एस. मरकड, बी. के. मरकड, किसवे सर, पाऊलबुद्धे सर आदी उपस्थित होते.

शाळेच्या आठवणी जाग्या करताना, तत्कालिन शाळेच्या १९९८च्या दहावी 'अ' तुकडीतील ५० माजी विद्यार्थी मैदानात एकत्र आले. किसवे सर यांनी मैदानात प्रार्थना घेतली. त्यानंतर सर्व विद्यार्थी रांगेने ज्या वर्गात शिकले, त्याच वर्गातील आपापल्या बाकांवर जाऊन बसले. वर्गशिक्षक नजन सर यांनी हजेरी घेतली. तसेच क्लास घेत मार्गदर्शन केले. नंतर सर्व शिक्षकांचा सत्कार करून त्यांचा गौरव समारंभ झाला. नजन सर, जाधव सर, किसवे सर यांनी सर्वांना मार्गदर्शन करून पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

सर्व विद्यार्थ्यांनी आपापली मनोगते सादर केली. मुंबई, पुणे येथे कोणी खासगी कंपनीत नोकरीला लागले आहे, तर काही जण शिक्षक झाले आहेत. त्यांनी आपापला परिचय मनोगतात करून दिला. त्यानंतर सर्वांनी एकत्र स्नेहभोजन घेत विचारांची देवाण-घेवाण केली. अशोक पवार यांनी सूत्रसंचालन केले. नजन सर यांनी शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त केल्याबद्दल विद्यार्थ्यांचे आभार मानले. एकमेकांची गळाभेट घेत पुन्हा भेटण्याचे ग्वाही देऊन ही पाखरे पुन्हा एकदा आपआपल्या मार्गांनी निघुन गेली.

# संगमनेरमध्ये साधूंना बेदम मारहाण

## राजकीय वातावरण पुन्हा तापले

**संगमनेर : प्रतिनिधी**

**काही साधू भगवे कपडे परिधान करून संगमनेर शहरातील नवीन नगर रस्त्यावरून जात असताना काही तरुणांनी साधूंना बेदम मारहाण केली. सध्या त्या चार साधूंना घुलेवाडी येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. त्यामुळे तालुक्यात पुन्हा तणावाचे वातावरण झाले आहे. या मारहाणीत दोन साधूंच्या बरगड्या तुटल्या असून ते**



**गंभीर जखमी झाले आहेत. याप्रकरणी संगमनेर पोलिसांनी एक जणास ताब्यात घेतले आहे.**

दरम्यान घडलेली घटना अशी की, चार साधू नगर रोडला कुटे रुग्णालयाजवळ जात असताना काही विकृत लोकांनी त्यांना मारहाण केली. त्यांना घुलेवाडी ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. संगमनेरात एकीकडे प्रचाराचा जोरदार धुराळा उडत असताना परवाच्या निंभाळेच्या घटनेने राजकीय सोबतच सामाजिक वातावरण चांगलेच ढवळून निघाले असताना पुन्हा साधूंना झालेल्या मारहाणीने पुन्हा राजकीय वातावरण तापले आहे.

# प्रचार करता करता काँग्रेस उमेदवार थेट भाजपच्या कार्यालयात !

**नागपूर : प्रतिनिधी**

**नागपूर मध्ये विधानसभा मतदारसंघातून काँग्रेसचे बंटी शेळके यांनी उमेदवारी देण्यात आली आहे. त्यांच्या विरोधात भाजपचे प्रविण दटके यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवण्यात आले आहे. या दोन्ही उमेदवारांचा मतदारसंघात जोरदार प्रचार सुर आहे. यावेळी बंटी शेळके प्रचार करत थेट भाजपच्या कार्यालयात गेल्याचे समोर आले आहे. याचा व्हिडिओ देखील चांगलाच व्हायरल होताना दिसत आहे.**


अंगात लाल टीशर्ट आणि निळ्या रंगाची जीन्स घालून काँग्रेस उमेदवार बंटी शेळके प्रचार करता करता थेट प्रतिस्पर्धी भाजप उमेदवार प्रविण दटके यांच्या कार्यालयात




गेले. भाजपच्या कार्यालयात जाताना तिथे उपस्थित कार्यकर्ते यांना हस्तांदोलन केले. तसेच बंटी शेळके यांच्या वयापेक्षा मोठे असणाऱ्या उपस्थितांना वाकून नमस्कार देखील त्यांनी केला. तसेच भाजपच्या काही कार्यकर्त्यांनी बंटी शेळके यांना आलिंगन देखील दिल्याचे पाहायला मिळत आहे.

बंटी शेळके यांनी जेव्हा भाजपच्या कार्यालयात प्रवेश केला तेव्हा विशेष म्हणजे कोणीही त्यांना अडवले नाही. भाजपच्या कार्यकर्त्यांनी हस्तांदोलन करत व मिठी मारून त्यांचे स्वागत केले. राजकारणात कटुता नसावी याची प्रचिती हा व्हिडिओ बघून येत आहे. हा व्हिडिओ सोशल मीडियावर देखील मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.

# प्रभाग ११ मधील पाण्याचा प्रश्न आ. जगतापांनी दुर केला - अविनाश घुले





**अहिल्यानगर : प्रतिनिधी**

**नगर शहरातील प्रभाग क्रमांक ११ मधील बराच भाग वर्षानुवर्षे पिण्याच्या पाण्यापासून वंचित होता. पाण्याचे दुर्भिक्ष्य दुर करण्यासाठी आ. संग्राम जगताप यांनी पुढाकार घेत हा प्रश्न कायमस्वरूपी माग लावल्याचे मा. नगरसेवक अविनाश घुले यांनी सांगितले.**

अहिल्यानगर शहर विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार आ.संग्राम जगताप यांच्या प्रचारार्थ सुरू असलेल्या विकास यात्रेचे प्रभाग ११ मध्ये जल्लोषात स्वागत करण्यात आले. यावेळी अविनाश घुले यांनी आपल्या भावना मांडल्या. यावेळी आ. जगताप यांनी नागरीकांच्या वैयक्तीक भेटी घेतल्या. ठिकठिकाणी नागरीकांनी त्यांचे उस्फुर्त स्वागत केले.

पिण्याच्या पाण्याच्या टंचाईमुळे नागरीकांना हाल अपेष्टांना सामोरे जावे लागत होते. आ. जगताप यांनी विशेष लक्ष घालून ही समस्या दुर केली.या भागामध्ये अंतर्गत रस्त्यांचे काँक्रीटीकरण झाल्याने रस्त्याचे प्रश्नही सुटला आहे. सर्वसामान्य जनतेचे वैयक्तिक प्रश्न सोडवितानाच प्रत्येकाच्या सुख, दुःखात सहभागी होणाऱ्या आ. संग्राम जगताप यांच्या पाठीशी ठामपणे उभे असल्याचे अविनाश घुले यांनी सांगितले.

यावेळी मा. नगरसेवक नज्जू पैलवान, रूपसिंग कदम, संजय चोपडा,प्रकाश भागानगरे, मा. उपमहापौर गणेश भोसले, मुजाहिद कुरेशी,विनोद कदम, कमलेश भंडारी, संतोष तोडकर, पिनुशेठ कानडे, राजू बंग, नीलेश भंडारी, गोपाल वर्मा, दादा अल्हाट,फॅन्सी शेक्सपिअर, सुनील ढगे, मतीन शेख, प्रितम तोडकर, प्रवीण सुराणा,प्रशांत मुथा,मिलिंद कानडे, शरद करपे, संतोष जाधव, सागर जाधव, साहेबराव पंडीत, सचिन जाधव, भारत गायकवाड, अक्षय खांडेकर, मयुर लोखंडे, मयुर खांडेकर,अजिंक्य हंबर्डे, रशीद जहागिरदार, इम्रान जहागिरदार यांच्यासह मोठया संख्येने कार्यकर्ते हजर होते.

**युवा सेनेचे उपजिल्हाप्रमुख जाधव राष्ट्रवादीत**

गेल्या ३५ वर्षांपासून शिवसेनेमध्ये कार्यरत असलेले, शिवसेना उध्दव ठाकरे गटाच्या युवा सेनेचे उपजिल्हाप्रमुख विजय जाधव यांनी त्यांच्या कार्यकर्त्यांसह आ. संग्राम जगताप यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी अजित पवार गटात प्रवेश केला. आ. जगताप यांनी त्यांचे स्वागत केले.

**आ. जगताप यांच्या कामावर प्रभावित होऊन प्रवेश**

आ. संग्राम जगताप यांनी या भागाचे मुलभूत प्रश्न सोडवित चांगल्या सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यांच्या या कामावर या परिसरातील नागरीक समाधानी आहेत. आ. जगताप यांच्या कामावर प्रभावित होऊन या भागातून जास्तीत जास्त मताधिक्य देण्यासाठी आपण राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करून आ. संग्राम जगताप यांना साथ देण्याचा आपण निर्णय घेतला.

विजय जाधव
युवा सेना उपजिल्हाप्रमुख

# प्राजक्तला आमदार करा, मंत्रीपदाची जबाबदारी माझी!

## ■ शरद पवार यांचे आश्वासन ■ आ. प्राजक्त तनपुरे यांच्या प्रचारार्थ वांबोरीत सभा

वांबोरी : विशेष प्रतिनिधी

**प्राजक्त तनपुरे यांच्याकडे पाच वर्षाचा अनुभव आहे. तुम्ही मोठया मताधिक्क्याने त्यांना सत्ता दिली. यावेळी महाराष्ट्राचे राजकारण, महाराष्ट्राची सत्ता तुम्ही आमच्या हातात दिली तर मी जाहिरपणे सांगतो की महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळात प्राजक्त तनपुरे यांना जबाबदार घ्यावी लागेल, ती देण्याची जबाबदारी आम्हा लोकांकडून पार पडली जाईल. त्यासाठी तुमची सर्वांची शक्ती, तुमचा आधार त्यांच्या पाठीशी उभा करण्याचे आवाहन राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी केले.**

महाविकास आघाडीचे राहुरी-नगर-पाथर्डी मतदारसंघाचे उमेदवार प्राजक्त तनपुरे  यांच्या प्रचारार्थ वांबोरी येथे आयोजित करण्यात आलेल्या जाहिर सभेमध्ये शरद पवार यांनी मार्गदर्शन केले. यावेळी मा. खासदार प्रसाद तनपुरे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके, मा. आमदार दादाभाऊ कळमकर, राष्ट्रवादी युवती कॉंग्रेसच्या प्रदेशाध्यक्षा सक्षणा सलगर, गोविंद मोकाते, योगिता राजळे, बाळासाहेब हराळ, अशोक बाबर यांच्यासह मोठा जनसमुदाय यावेळी उपस्थित होता.

यावेळी बोलताना शरद पवार म्हणाले, लोकसभेनंतर विधानसभेची निवडणूक होत आहे. लोकसभा निवडणूकीच्या प्रचारासाठी मी राहुरीला आलो होतो. मला आनंद वाटतोय तुम्ही मोठया मताधिक्क्याने नीलेश लंके यांना विजयी केले. अडीच वर्षांचा कोरोनाचा काळ सोडला तर राज्यात भाजपाचे  सरकार आहे. पुन्हा ते राज्याचा कारभार करू इच्छितात. काही काळ आम्ही सरकार  चालविले. एकनाथ शिंदे यांनी ४० आमदार घेऊन सरकार पाडले. शिंदेंच्या नेतृत्वाखाली सरकार सत्तेवर आले. प्रत्येक मंत्रीमंडळात देवेंद्र फडणवीस होते. असे असतानाही पक्ष फोडण्याचे काम फडणवीस यांच्याकडून झाले. पक्ष फोडणे आणि सत्ता घेणे हा रस्ता लोकशाहीचा आहे का ? लोकांना हे पटत नसल्याचे पवार म्हणाले.



■ आ. प्राजक्त तनपुरे यांच्या प्रचारार्थ वांबोरी येथेझालेल्या जाहिर सभेत खा. शरद पवार यांनी मार्गदर्शन केले.

### तनपुरे यांच्या कामाचे राज्यात कौतुक

तुमच्या मतदारसंघात प्राजक्त तनपुरे यांच्यासारख्या एक जाणकार तरूणाने अभ्यासू आमदार म्हणून पाच वर्षे काम केले. त्यांच्या कामची आठवण ठिकठिकाणी काढली जाते. महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळात त्यांना काम करण्याची  संधी मिळाली. त्या संधीचे  त्यांनी सोने केले. मी विदर्भात गेलो त्यावेळी वीजेच्या प्रश्नांबाबत शेतकऱ्यांचा विचारले असता त्यांनी प्राजक्त तनपुरे  हे उर्जा खात्याचे मंत्री असताना वीजेचे सर्व प्रश्न दुर केल्याचे आवर्जुन सांगितले. त्यांच्याकडे कोणतेही काम घेऊन गेल्यानंतर त्यांनी नम्रपणे वर्तन करून आमचे काम करून दिल्याचेही शेतकऱ्यांनी सांगितल्याची आठवण पवार यांनी यावेळी सांगितली.

### संरक्षण नाही आणि लाडकी बहिण म्हणता !

लोकसभेचा निकाल आल्यानंतर सत्ताधारी नविन नविन कार्यक्रम जाहिर करू लागले. लाडक्या बहिणींना मदत केली, माझी तक्रार नाही. गेल्या सहा महिन्यात ८६६ भगिणींचे अपहरण झाले. बहिणींना संरक्षण नाही आणि तुम्ही लाडक्या बहिणी म्हणता ? असे सांगत पवार यांनी सरकारवर टीका केली.

### त्यांना सत्तेवर बसण्याचा अधिकार नाही

आज महाराष्ट्रात वर्षभरात १ हजार १०० पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. ही स्थिती आजच्या राज्यकर्त्यांच्या काळात असेल तर निकाल घ्यावा लागेल, शेतकऱ्यांच्या आत्महत्या करण्यास भाग पाडणारे भाजपावाले असोत त्यांचे मित्र पक्ष असोत, त्यांना सत्तेवर बसण्याचा अधिकार नाही हा निकाल तुम्ही घेतला पाहिजे.

शरद पवार

### महावितरणमध्ये पायाभुत सुविधा निर्माण केल्या

सत्तर वर्षानंतर पवार साहेबांनी मंत्रीपदाची संधी दिली. मंत्रीमंडळात काम करताना उर्जा खात्याचा कारभार हाती घेतल्यानंतर महावितरणकडे एकही योजना नव्हती. पायाभुत सुविधा नव्हत्या. कारभार हाती घेतल्यानंतर महावितरणमध्ये पायाभुत सुविध निर्माण केल्या. शेतकऱ्यांना नव्या डीपी देण्याचे धोरण स्विकारले. नवे सब स्टेशन उभारले. भाजपाच्या सरकारने सोई सुविधांसाठी राखीव निधी ठेवलेला असताना तो गोठविला गेला.

प्राजक्त तनपुरे
महाविकास आघाडीचे उमेदवार

### आरक्षण न देणारांना मते देऊ नका

गेल्या दहा वर्षांपासून धनगर बांधवांना भुलथापा दिल्या जात आहेत. त्यांना भिक घालू नका.आपण मल्हारराव होळकरांचे वारसदार आहोत. त्यांनी अटकेपार झेंडा  फडकविला. शपथ आहे तुम्हाला मल्हारराव होळकरांची,अहिल्यादेवींच्या वारसदारांची की स्वाभिमानी माणसाला मतदान करा.गद्दारी करणारांना मतदान करून नका. विचारांना मतदान द्या. गुंडागद करणारांना नव्हे तर सुसंस्कृत प्राजक्तदादाला, महाराष्ट्राचा स्वाभिमान जागविणाऱ्या प्राजक्त तनपुरे यांच्या पाठीशी उभे रहा.

सक्षणा सलगर
प्रदेशाध्यक्षा, राष्ट्रवादी युवती कॉंग्रेस

### त्यांनी दहा वर्षे काय कामे केली ?

विरोधी उमेदवार दहा वर्षे आमदार होते. त्यांचे दहा वर्षातील एखादे ठळक काम आहे का ? वेगवेगळ्या मुद्यावर ते  विषय भरकवटत आहेत. आमदार म्हणून त्यांनी काय केले ? निळवंडे धरणाचे पाणी आणू शकले नाहीत. वांबोरी चारीचा प्रश्न, मुळाच्या पाण्याचे ते नियोजन ते करू शकले नाहीत. राहुरीच्या बसस्थानकाचा साधा प्रश्न  सोडवू शकले नाहीत. दहा वर्षात याची-त्याची जिरवण्याशिवाय त्यांनी काही केले नाही. अडीच वर्षे झोपलेले होते आता निवडणूक आल्यावर उडया मारायला लागले असल्याचा घणाघाती आरोप तनपुरे यांनी केला.

### प्रत्येकाच्या घरात प्राजक्ताचा सडा पाहिजे !

इथे गुंडांची संख्या खूप वाढली आहे असे मला इथे आल्यानंतर समजले. गुंड कुठलेही असू द्या.त्यांची गुंडागद रोखण्यासाठी प्राजक्त तनपुरे हाच पर्याय आहे. प्राजक्त तनपुरे  हे सुसंस्कृत आहेत. प्राजक्ताचा हा सडा प्रत्येकाच्या घरात जशी रांगोळी असते तसा हा प्राजक्ताचा सडा असला पाहिजे. तरच तुमचे जीवन सुखाचं, आनंददायी, आणि सुगंधीत होईल.

### नवीन असूनही संधी दिली

प्राजक्त यांनी गेल्या वेळी पहिली निवडणूक होती. त्यांच्या कामाची पध्दत आम्ही हेरली. ज्यावेळी मंत्रीमंडळ स्थापनेची वेळ आली त्यावेळी नवीन असले तरी त्यांना मंत्रीपदाची संधी देण्याचा आम्ही निकाल घेतल्याचे पवार म्हणाले.

### तनपुरे लाख मतांनी विधानसभेत जाणार

या मतदारसंघात वातावरण फिरलं. वांबोरीच्या सभेला येताना मला ते ठिकठिकाणी जाणवले. येत्या २३ तारखेला प्राजक्त तनपुरे हे हजारो नव्हे तर लाखाच्या मताधिक्क्याने विधानसभेत जाणार असल्याचे  सक्षणा सलगर म्हणाल्या.

### आश्वासने देऊन तीन निवडणूका काढल्या

विरोधी उमेदवाराकडे माझ्या विरोधात बोलण्याजोगा विकासाचा कोणताच मुद्दा नाही. विविध मुलभूत प्रश्नांना हात घालण्याचे काम मी पाच वर्षात केले. अहोरात्र अभ्यास करून मतदारसंघाच्या कानाकोपऱ्यात विकासाची गंगा पोहचविण्याचे काम केले आहे. निळवंडे धरणाच्या कामाबाबत विरोधी उमेदवाराने तीन निवडणूकांमध्ये केवळ आश्वासने दिली. पाणी आणले नाही तर मला जोडयाने  हाणा असे सांगत तीन निवडणूका काढल्याची टीका तनपुरे यांनी केली.

### निळवंडेचे पाणी राहुरीत पोहचले

मला संधी मिळाल्यानंतर निळवंडे धरणाच्या कालव्यांना १ हजार २५० कोटींचा निधी मंजुर करून आणला आणि आज राहुरी तालुक्यात निळवंडे  धरणाचे पाणी पोहचले आहे. वांबोरी चारीच्या पाण्यासाठी विरोधी उमेदवाराने बटन दाबण्याच्या कामाशिवाय दुसरे काही केले नाही. या चारीचे हक्काचे ६८० एफसीएमटी पाणी ते देऊ शकले नाहीत. पाच वर्षाच्या कालावधीत ६८० एफसीएमटी व्यतिरिक्त ओव्हरफलोचे पाणी टेलच्या गावापर्यंत पोहचविण्याचे काम मी केल्याचे तनपुरे म्हणाले.

### आकडे खोटं बोलणार नाहीत

समोरा समोर चर्चेला बसा. कदाचित ते खोटे बोलतील, मी खोटे बोलेल परंतू आकडे खोटे बोलू शकणार नाहीत. कधी काळी वांबोरी चारीला एक टीएमसी पाणी देण्याचे काम आपण केले आहे.

### डोक्यात मंत्रीपदाची हवा शिरू दिली नाही

राहुरीकरांनी मला आमदार म्हणून संधी दिली. आमदारकीची, मंत्रीपदाची हवा मी कधी डोक्यात शिरू दिली नाही. मी सातत्याने विकास करण्याचाच प्रयत्न केला. मंत्रीपदाच्या माध्यमातून याची जिरवतो, त्याच्याकडे बघतो असे कधी केले नाही. तसे करत बसलो असतो तर इतका मोठा विकास आपण करू शकलो नसतो.

प्राजक्त तनपुरे, महाविकास आघाडीचे उमेदवार

---

# महायुतीचे सर्व कार्यकर्ते माझ्यासोबत

## ■ काशिनाथ दाते यांचा दावा ■ वडगांव सावताळ येथे  नागरिकांशी साधला संवाद




वडगांव सावताळ : प्रतिनिधी

**महायुतीचे सर्व कार्यकर्ते माझ्यासोबत असून ते प्रचारात सक्रिय आहेत. गावागावांमध्ये आमच्या प्रचारास नागरिकांकडून प्रतिसाद मिळत असून कार्यकर्त्यंनी अन्याय सहन न करता, दबाव झुगारून, प्रतिकार करा.आपला विजय निश्‍चित असल्याचे प्रतिपादन महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते यांनी केले.**

विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणूकीतील महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते यांच्या प्रचार दौऱ्यादरम्यान दाते यांनी वडगांव सावताळ येथील नागरिकांशी संवाद साधला.
यावेळी बोलताना दाते म्हणाले, माझी उमेदवारी अन्यायाला विरोध करण्यासाठी आहे. सर्वसामान्यांसाठी आहे. पारनेर हा बुध्दिजीवी व सुसंस्कृत लोकांचा मतदारसंघ आहे. हीच ओळख कायम रहावी, शांतता प्रस्थापित व्हावी, विकासाचा गाडा रूळावर यावा यासाठी मी परिवर्तनाची हाक दिली आहे. सर्व घटकांना बरोबर घेऊन काम करण्याचा माझा स्वभाव असून माझ्यासोबत असलेल्या कोणत्याही कार्यकर्त्याला वाऱ्यावर सोडले जाणार नाही. पारनेरला पुन्हा विकासाकडे नेण्यासाठी माझी निवडणूक  असल्याचे दाते म्हणाले.

यावेळी जिल्हाध्यक्ष अशोक सावंत, बाबाशेठ खिलारी, अरूण ठाणगे, युवराज पठारे, शिवाजी खिलारी, बाबासाहेब शिंदे, पंढरीनाथ उंडे, सुभाष ठाणगे,  बाबासाहेब दाते, बाळासाहेब रोकडे, बी.टी. खामकर, अशोक रोकडे, निवृत्ती वाळुंज, प्रदीप वाळुंज, गीताराम वाळुंज, बाळासाहेब वाळुंज, जयवंत वाळुंज, सखाराम मंचरे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

### मतदारसंघाचे  भाग्य उजाळणार

काशिनाथ दाते यांच्याकडे गेल्या ४० वर्षांचा गाढा अनुभव आहे. त्यांच्याकडे तालुक्याच्या विकासाचे एक  व्हिजन असून ज्याच्यामुळे पारनेर-नगर मतदारसंघाचे भाग्य उजाळणार आहे. वकृत्व,दातृत्व आणि कर्तुत्व ही त्रिसुत्री दाते यांच्याकडे आहे. गोरगरीबांचे ते कैवारी आहेत. महाराष्ट्रातील वारकरी सांप्रदायाच्या दिंडीला महायुती सरकारने २० हजार रूपयांची मदत केली. आजवर अशी मदत कोणी दिली नाही. गो मातेला राजमातेचा दर्जा दिला. मराठी भाषेला अभिजात दर्जा दिला. म्हणून महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते यांना मतदान करा.

ह भ प बाबासाहेब शिंदे
मा. सरपंच वडगांव सावताळ

### महिला सक्षमीकरणाचे काम

महायुती सरकारच्या माध्यमातून झाले आहे. अजित पवार, राधाकृष्ण विखे  यांनी अतिशय चांगला, सुसंकृत उमेदवार दिला आहे. तालुक्यात उद्योगधंदे आणायचे असतील, बेरोजगारांना रोजगार मिळवायचा असेल तर काशिनाथ दाते यांना निवडून दिल्याशिवाय पर्याय नाही. आपल्या सर्व योजना चालू ठेवायच्या आहेत. युवकांना भविष्य द्यायचे आहे.

डॉ. भाऊसाहेब खिलारी

# नगरकरांना भावतेय आ. जगताप यांची चित्रफित!

## डिजिटल स्क्रीनवरील विकासाची मालिका पाहण्यासाठी गर्दी

अहिल्यानगर : प्रतिनिधी

**नगर शहराचे आमदार म्हणून गेल्या दहा वर्षात विकास कामांचे नियोजन करून राबविण्यात आलेल्या विविध विकास कामांची डिजिटल स्क्रीनवरील चित्रफित नगरकारांना चांगलीच भावतेय. चौकाचौकांमध्ये ही चित्रफित पाहण्यासाठी नागरीक गर्दी करत आहेत. त्यात महिलांची संख्याही लक्षणीय आहे.**

लोकप्रनिधी म्हणून नगर शहराचे प्रतिनिधीत्व विधिमंडळात करताना विकास कामांचे नियोजन करून आ. जगताप यांनी राज्य शासनाचा कोटयावधी रूपयांचा निधी मंजुर करूण आणला. आ. जगताप यांच्या दुरदृष्टीतून विकासाचे विविध प्रकल्प शहरात उभे राहत आहेत.

रस्त्यांच्या कामासाठी राज्य शासनाकडून दिडशे कोटींचा निधी मंजुर करून आणण्यात आ. जगताप यांना यश आले असून शहराच्या विविध भागांमध्ये रस्ते कॉंक्रीटीकरणाची कामे प्रगतीपथावर आहेत. रस्त्यांच्या कामांबरोबरच म्युझिकल फाउंटन, स्पोर्ट क्लब, आरोग्याच्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलची निर्मिती, शहराच्या विविध भागात स्टॅच्यू, फेज टू पाणी योजना, अमृत भुयारी गटार योजना आदी प्रमुख कामांसह गेल्या दहा वर्षात करण्यात आलेली विकास कामे शहरातील चौका-चौकात एलईडी स्क्रीनच्या माध्यमातून नागरीकांना दाखविण्यात येत असून नागरीकांना ते भावत आहेत. चित्रफित पाहून नागरीक विकास कामांचे कौतुक करत आहेत.



### विकास हाच जगताप यांचा अजेंडा

गेल्या दहा वर्षात केलेली कामे जनतेपुढे ठेऊन आ. संग्राम जगताप हे या निवडणूकीस सामोरे जात आहेत. त्यांनी केलेल्या विकास  कामांमुळे त्यांच्या विविध प्रभागांतील प्रचार फेऱ्यांना नागरीकांचा उस्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. ठिकठिकाणी नागरीक आ. जगताप यांचे पुष्पवृष्टी करून स्वागत करत आहेत. महिला औक्षण करून लाडकी बहिण योजना राबविल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करत आहेत. विकास हाच आ. जगताप यांच्या प्रचाराचा अजेंडा आहे.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com